सकाळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्ता संस्था)

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११ ००१.

Website : https://barti.maharashtra.gov.in

## अनुसूचित जातीच्या अनुसूचीतील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी समाजातील युवक-युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ.मध्ये लिपीक वर्गीय स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मोफत प्रशिक्षण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेकडून अनुसूचित जाती मधील मांग, मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी समाजातील युवक-युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ.मध्ये लिपीक व त्या समकक्ष पदाच्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी चार महिन्याच्या कालावधीचे (निवास व भोजन व्यवस्थेसह) मोफत प्रशिक्षण कार्यक्रम (कोचिंग कलासेस) खाजगी संस्थेच्या माध्यमतून **पुणे, नागपूर, औरंगाबाद, अकोला व ठाणे** या ठिकाणी राबविण्यात येणार आहे. या प्रत्येक प्रशिक्षण केंद्रावर वर नमूद जातीमधील ५० युवक-युवतींना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल. ३० टक्के जागा मांग व वर नमूद तत्सम जातीमधील महिलांकरिता राखीव राहिल. ३ टक्के जागा मांग व वर नमूद तत्सम जातीतील दिव्यांग (Person With Disability) व्यक्तीसाठी राखीव राहिल.

वरील जातीच्या इच्छुक व पात्र युवक-युवतींना **https://barti.maharashtra.gov.in** या वेब साईटवरुन **Notice Board** च्या सदराखाली **Coaching - Mang-Matang** लिंकवरुन अर्ज डाऊन लोड करुन किंवा खालील नमूद संस्थेच्या कार्यालयातून प्राप्त करुन, खालील पैकी ज्या ठिकाणी त्यांना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे. त्या ठिकाणी असलेली खालील नमूद संस्थाकडे दि. १२/११/२०१८ पर्यंत परिपूर्ण भरलेला अर्ज कागद पत्रांसह सादर करावा.

| अ. क्र. | खाजगी संस्थेचे नांव, पत्ता व मुख्यालय - ठिकाण | अ. क्र. | खाजगी संस्थेचे नांव, पत्ता व मुख्यालय - ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | **स्वप्नपूर्ती सेवाभावी संस्था**<br>ओम व्हिजन अॅकडमी, शॉप नं. ११, ९८५ बहुपती कॉम्प्लेक्स सदाशिव पेठ, ज्ञानप्रबोधन शाळे समोर, पुणे -३०<br>मोबाईल क्रमांक ९०६७४३६०८४ **ठिकाण - पुणे** | २. | **अस्मिता मागासवर्गीय बहुउद्देशीय विकास व संशोधन संस्था, अकोला**<br>कौलखेड रोड, हिंगणा फाटा, बाजोरिया नगरी जवळ, अकोला-४४४००५ मो. नं. ९६५७४१८६४८ /९७६५२६१०४८<br>**ठिकाण - अकोला** |
| ३. | **महाराष्ट्र मातंग विकास मंडळ**<br>प्लॉट नं. ४ राजेन्द्र नगर, हिंगाणा नाका, हिंगाणा रोड, ऑर्चीड हॅटेल चे वर नागपूर - ४४००३६<br>मो. नं. ७०८३६८१९२२ / ८९८३२९१८८२ **ठिकाण - नागपूर** | ४. | **मानसी महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था, ठाणे**<br>४, अशोकवन, बिल्डींग नं. १, ओमकार कॉ. ऑ. हौ. सो. निमकर नाका, गणेश मंदिर रोड, टिटवाळा ईस्ट, ता. कल्याण, जि. ठाणे.<br>मो. नं. ९०२९०११८१८ **ठिकाण - ठाणे** |
| ५. | **श्री. जी. बहुउद्देशीय संस्था**<br>प्लॉट नं. ५, एम.आय.डी.सी. स्टेशन रोड, ता. जि. औरंगाबाद. मोबाईल क्रमाक : ८८८८७८८७५६/ ९९२१६००२९९<br>**ठिकाण - औरंगाबाद** | | |

**योजनेच्या अटी व शर्ती :**

१. उमेदवार ह्या मांग किंवा वर नमूद तत्सम जातीचा असावा.

२. उमेदवार ह्या महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा

३. उमेदवाराचे वय १८ ते ३५ पर्यंत असावे.

४. उमेदवार किमान १२ वी पास असावा.

५. निवड केलेल्या उमेदवाराची प्रशिक्षणा दरम्यान निवासाचा व भोजनाच्या खर्चासाठी शासन निर्णयानूसार बार्टी कडून वर नमूद संबंधित संस्थेला निधी देण्यात येईल व उमेदवारासाठी नि: शुल्क निवास व भोजन व्यवस्था संबंधित संस्थामार्फत करण्यात येईल.

६.उमेदवारांना बार्टी मार्फत लिपिक स्पर्धा परिक्षा तयारीसाठी रु. ३०००/- किंमतीचे पुस्तकांचा संच देण्यात येईल.

७.विहीत नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांसहीत प्रशिक्षण संस्थेकडे अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांपैकी पात्र उमेदवाराची संबंधित संस्थेच्या ठिकाणी संस्थेच्या परिसरात किंवा संस्थेने सुचवलेल्या इतर परिसरात **दिनांक १५/११/२०१८ रोजी चाळणी परिक्षा** घेऊन त्यामधून उमेदवारांची गुणानुक्रमे ५० प्रशिक्षणार्थ्यांची निवड करण्यात येईल व १० प्रशिक्षणार्थी प्रतिक्षा यादी वर ठेवण्यात येईल , सदर चाळणी परीक्षा बार्टी व संबंधीत संस्थानी मिळून नियोजन करण्यात येईल.

८. संबंधित प्रशिक्षण संस्थेकडे अर्ज दाखल करण्याची अंतिम दिनांक १२/११/२०१८ असा आहे.

९. सदर प्रशिक्षण दि. २०/११/२०१८ पासून बार्टीने निर्धारीत केलेल्या विहित तारखेला सुरु करण्यात येईल.

**अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्रे :**

१. उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो

२. जातींच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

३. इ. १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका प्रत व इतर शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती

४. शाळा सोडल्याचा दाखला किंव वास्तव्याच्या योग्य पुराव्याची साक्षांकित प्रत जोडावी.

सविस्तर माहितीसाठी पाहा. **https://barti.maharashtra.gov.in** या वेब साईटवरुन **Notice Board** च्या सदराखाली **Coaching-Mang-Matang** लिंकवर.

कैलास कणसे (भापोसे)
महासंचालक, बार्टी

Advt/IBPS/26/10/2018/35